ज्ञान हेच खरे संपत्तीचा खजिना आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ७ मे २०२५ | अंक १४६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# भारताने पहलगामचा बदला कसा घेतला ? वाचा ऑपरेशन सिंदूरचे मिनिट टू मिनिट डिटेल्स

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या नृशंस दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने पाकिस्तान आणि पीओकेवर हल्ला केला आहे. मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास हा हल्ला करण्यात आला. देशाच्या तिन्ही सैन्याने संयुक्त कारवाईत 9 ठिकाणी हल्ला केला. या कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले आहे. भारताकडून करण्यात आलेल्या या हल्ल्यात 50 पेक्षा अधिक दहशतवादी मारले गेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी रात्रभर ऑपरेशन सिंदूरवर लक्ष ठेवून होते. या ऑपरेशन सिंदूरचे मिनिट टू मिनिट डिटेल्स जाणून घेऊया.




असे झाले ऑपरेशन सिंदूर रात्री 1.47 वाजता: PoK स्फोटाचा आवाज ऐकू आला. मंगळवारी मध्यरात्रीनंतर मुझफ्फराबाद शहराभोवती असलेल्या पर्वतांजवळ अनेक मोठे स्फोट ऐकू आल्याचे अनेक प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. स्फोटांनंतर शहरातील वीजपुरवठा खंडित झाला. 1.51 वाजता: भारतीय सुरक्षा दलांनी पाकिस्तान आणि पीओकेमध्ये हल्ले केले. दहशतवाद्यांच्या अड्ड्यांना लक्ष्य करून हा हल्ला करण्यात आला. यानंतर काही वेळातच संतापलेल्या पाकिस्तानी लष्कराकडून एक निवेदन आले. भारताच्या कृतीला प्रत्युत्तर देऊ असा इशारा त्यांनी दिला. 2.10 वाजता: भारताने पाकिस्तान आणि पीओकेमध्ये हल्ला केल्याची अधिकृत माहिती समोर आली. त्याला ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आले. एकूण 9 ठिकाणी हल्ले झाले. 2.17 वाजता: पाकिस्तानच्या डॉन न्यूजच्या वृत्तानुसार, इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स (ISPR) चे महासंचालक लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी म्हणाले की, भारताने कोटली, बहावलपूर आणि मुझफ्फराबादमध्ये क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. 4.13 वाजता: या हल्ल्यांमध्ये भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दल या तिन्ही दलांचा वापर करण्यात आला. यामध्ये प्रिसिजन अटॅक वेपन सिस्टीमचा वापर करण्यात आला. 4.32 वाजता: अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी भारताच्या हल्ल्याबाबत पाकिस्तानी एनएसए आणि आयएसआय प्रमुख लेफ्टनंट जनरल असीम मलिक यांच्याशी चर्चा केली. 4.35 वाजता:भारताच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानला जाणारी अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली. 5.04 वाजता: हल्ला झालेल्या नऊ ठिकाणांपैकी चार पाकिस्तानात आणि पाच पाकव्याप्त काश्मीरमध्ये आहेत. पाकिस्तानमधील तळांमध्ये बहावलपूर, मुरीदके आणि सियालकोट यांचा समावेश आहे. 5.27 वाजता: आम्ही भारत आणि पाकिस्तानमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत. अमेरिकेला आशा आहे की हे लवकरच संपेल, असे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्क रुबियो म्हणाले. 5.45 वाजता: कतार एअरवेजने पाकिस्तानला जाणारी सर्व उड्डाणे रद्द केली. 6.00 वाजता: पाकिस्तानने पुन्हा एकदा युद्धबंदी कराराचे उल्लंघन केले आणि पूंछ-राजौरी सेक्टरमधील भिंबर गली भागात तोफांचा मारा केला. 6.08 वाजता: ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी असलेले सर्व भारतीय वैमानिक आणि लढाऊ विमाने सुरक्षितपणे तळावर परतले. 6.14 वाजता: पाकिस्तानने आपली एअरस्पेस बंद केली. 9 ठिकाणी झाला हल्ला, दहशतवाद्यांचे अड्डे लक्ष्य बहावलपूर हे जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय असलेल्या आंतरराष्ट्रीय सीमेपासून सुमारे 100 किमी अंतरावर आहे. मुरीदके सांबाच्या समोरील सीमेपासून 30 किमी आत लष्कर-ए-तैयबा कॅम्प. 26/11 च्या मुंबई हल्ल्यातील दहशतवादी येथूनच आले होते गुलपूर हे पूंछ-राजौरीपासून नियंत्रण रेषेच्या आत 35 किमी अंतरावर आहे. 20 एप्रिल 2023 रोजी पूंछ येथे झालेला हल्ला आणि जून 2024 मध्ये प्रवासी बसवरील हल्ला यांचे मूळ येथेच आहे. पीओजेकेच्या तंगधार सेक्टरमध्ये 30 किमी आत लष्कर कॅम्प सवाई. बिलाल कॅम्प हे जैश-ए-मोहम्मदचे लाँचपॅड आहे. राजौरीच्या समोर नियंत्रण रेषेच्या आत 15 किमी अंतरावर लष्कर कोटली कॅम्प. लष्कराचे बॉम्बस्फोट प्रशिक्षण केंद्र, 50 दहशतवाद्यांची क्षमता. बरनाला कॅम्प राजौरी समोरील एलओसीच्या आत 10 किमी अंतरावर सांबा-कठुआच्या समोरील आंतरराष्ट्रीय सीमेच्या आत 8 किमी अंतरावर, सरजल कॅम्प जैश कॅम्प सियालकोटजवळील आंतरराष्ट्रीय सीमेपासून 15 किमी आत आहेमेहमूना कॅम्प, हिजबुल मुजाहिदीनचे प्रशिक्षण केंद्र आहे.

# हुतात्मा देवराव विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम! १२ वी विज्ञान ९८.९३ तर कला १२ वी कला ९०% निकाल

पाटोदा | प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय भायाळा यांनी यावर्षीही उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल 98.93% तर कला शाखेचा निकाल 90% लागला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सहकार महर्षी रामकृष्ण बांगर व संस्था सचिव तथा भायाळाच्या सरपंच सत्यभामाताई बांगर व युवा नेते विजयसिंह बांगर यांनी सर्व विद्यार्थ्यांसह प्राचार्य व प्राध्यापक यांचे अभिनंदन केले आहे. फेब्रुवारी मार्च 2025 मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेत हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल 98.93% तर कला शाखेचा 90 टक्के निकाल लागला असून विज्ञान शाखेतून अनपट सायली बाळासाहेब हिने 89.83% मिळवत प्रथम, इप्पर श्रद्धा सूरज 88% गुण मिळवत द्वितीय, बांगर भक्ती सुरेश 87.50 गुण मिळवत तृतीय, बांगर वैष्णवी बबनराव 86.50 चतुर्थ, गर्जे सृष्टी संदीप 86.50 गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला आहे, तसेच कला शाखेतून गायकवाड अशोक शहादेव याने 73 टक्के गुण मिळवत प्रथम, बावणे माऊली पाराजी




68.50% गुण मिळवत दुतीय तर बांगर माधुरी 68.35% गुण मिळवत तृतीय तर मंत्रे सोमेश्वर राजेभाऊ 67.00% गुण मिळवले असून 60 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे, तर उर्वरित विद्यार्थी प्रथम श्रेणीने उत्तीर्ण झाले आहेत. तरएकूण विद्यालयाचा निकाल 97.36 टक्के लागला. महाविद्यालयाच्या या नेत्रदीप यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, सरपंच सत्यभामाताई बांगर, युवा नेते विजयसिंह बांगर प्राचार्य दिनकर बांगर, प्रा. प्रज्ञा नाईकवाडे, प्रा.शिरीष कोल्हे, प्रा.विलास पवार, प्रा.राहुल जामकर, प्रा.सचिन पवार, प्रा.पवळे मॅडम यांच्यासह सर्व विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# भारताच्या मॉक ड्रिल मुळे पाकिस्तानची झोप उडाली, इस्लामाबादमध्ये मोठी घडामोड!




भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव कमालीचा वाढला आहे. या दोन्ही देशांत कोणत्याही क्षणी युद्ध होऊ शकते, असे म्हटले जात आहे. हीच बाब लक्षात घेता भारतात येत्या 7 मे रोजी देशभरात मॉक ड्रिल केली जाणार आहे. या मॉक ड्रिलमध्ये युद्ध चालू झाल्यास नागरिकांनी काय काळजी घ्यावी, याबाबत माहिती दिली जाणार आहे. दरम्यान, याच कारणामुळे पाकिस्तानची मात्र झोप उडाली आहे. भारतात मॉक ड्रिलची तयारी चाललेली असताना पाकिस्तान मात्र तणावात आहे. भारतात 7 मे रोजी नेमकं काय होणार?भारतात 7 मे रोजी सगळीकडे एअर रेड वॉर्निंग सायरन आणि ब्लॅकआऊट केलं जाणार आहे. युद्ध चालू झाल्यावर नागरिकांनी नेमकं काय करावं? याची माहिती या मॉक ड्रिलच्या माध्यमातून दिली जाणार आहे. देशात एकूण 244 जिल्ह्यांत ही मॉक ड्रिल केली जाणार आहे. याच कारणामुळे पाकिस्तानात मात्र सगळे चिंताग्रस्त झाले आहेत.

# भीषण पाणी टंचाई संदर्भात बीड नगर परिषदेच्या विरोधात शुक्रवारी भव्य हंडा मोर्चा - शेख निजाम

बीड प्रतिनिधी सध्या तीव्र उन्हाळ्यामुळे उन्हाची तीव्रता वाढली असुन बीड शहर व परिसरात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी बिंदुसरा धरण व माजलगाव बॅक वॉटर योजनेच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा केला जातो परंतु माजलगाव बॅक वॉटर योजनेतील काडी वडगाव येथे पाईपलाईन फुटल्यामुळे व इतर तांत्रिक अडचणीमुळे बीड शहराला होणारा पाणीपुरवठा मागील एक महिन्यापासून खंडित आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वन वन फिरावे लागत आहे. लोकांना पाण्यासाठी अतिरिक्त पैसे मोजून टँकर द्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक अत्यंत परेशान झालेला आहे. बीड मतदार संघाचे लोकप्रतिनिधी फक्त पाणी टंचाई संदर्भातील समस्ये कडे कोणतीही ठोस उपाययोजना न करता सोशल मीडिया व वर्तमानपत्राद्वारे आपले फोटो छापून आणण्याची हौस पूर्ण करीत आहेत. या व्यतिरिक्त त्यांचे कोणतेही वैधानिक काम या संदर्भात केलेले दिसत नाही. मागील ५० वर्षापासून बीड शहरावर ठराविक कुटुंबाची सत्ता आहे व त्यांनी आपल्या सत्तेच्या कालखंडात बीड शहरातील कोणत्याही समस्या सोडविल्या नाहीत. त्या समस्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत त्या अद्याप पर्यंत पूर्ण केलेल्या नाहीत किंवा त्यांची तशी मानसिकता व योग्य दिशा त्यांच्याकडून दिसत नाही. बीड नगर परिषदेची प्रशासन संपूर्णतः कोलमडले असून शहरातील नागरिकांना स्वच्छता, पाणीपुरवठा ,विद्युत पथदिवे व इतर पायाभूत सुविधा साठी झगडावे लागत आहे. ज्यांना निवडून दिले ते फक्त आम्हीच किती कर्तृत्ववान आहोत असा भ्रम लोकांमध्ये निर्माण करून स्वतःचे गुणगान गात आहेत. हे आम्हीच केले, कोर्टात आमुक केलं, तमुक केलं यांतच ते मग्न आहेत. सर्व सामान्य जनतेच्या पायाभूत सुविधांवर यांना काहीच घेणे देणे नाही. या सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर बीड नगर परिषदेवर शुक्रवार दिनांक ९ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासून बीड नगर परिषद कार्यालय भव्य हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम, लोकपत्रकार भागवत तावरे, शेख अमर, खय्युम इनामदार, शेख खदीर, शेख जाकीर, सय्यद आजम, पठाण आयुब, मोमीन जुबेर आदींनी केले आहे

# प्रा.डॉ.कल्पना दिपक विधाते घाडगे याचा शानदार कौतुक सोहळा सपन्न

बीड : डॉ.विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज अहिल्यानगर येथे कार्यरत असणाऱ्या प्रा कल्पना दिपक विधाते ( घाडगे ) यांनी नुकतीच इलेक्ट्रीकल इंडिअरिंग मध्ये सर्वोच्च पदवी झकऊ डॉक्टरेट प्राप्त केली आहे. त्या निमित्य बीड मध्ये तिचा शानदार सत्कार सोहळा संपन्न झाला. कल्पना विधाते यांचे शालेय शिक्षण संस्कार विद्यालय बीड तसेच महाविदयालयीन शिक्षण स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे झाले. पदव्युत्तर शिक्षण मॉडर्न कॉलेज पुणे येथे झाले. डॉक्टरेट पदवी ओरिएंटल विद्यापीठ इंदौर येथे प्राप्त केली. डॉ कल्पना विधाते यांच्या कौतुक सोहळयात संस्कार प्रबोधिनीचे सचिव ड कालीदास थिगळे,उपाध्यक्ष भाऊसाहेब बोबडे, माजी मुअ बी डी कुलकर्णी, झुंजार नेताचे संपादक अजित वरपे यांच्या हस्ते डॉ कल्पना दिपक विधाते यांचा सत्कार संपन्न झाला. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना कालीदास थिगळे यांनी डॉ कल्पनाचे कौतुक केले . इंजिनिअरिंग क्षेत्रात डॉक्टरेट मिळवणे ही अत्यंत कठीण व कष्टाची बाब आहे. कल्पनाने तिचे ध्येय साध्य केले ही संस्कार विद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. डॉ कल्पनाच्या मार्गदर्शनाखाली उत्तम अभियंते घडावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी भाऊसाहेब बोबडे यांनी प्रतिकुल परिस्थितीत कल्पनाने यशाचे शिखर गाठले याबद्दल आनंद व्यक्त केला.

# बीड येथून राशन दुकानातील ३०० क्विंटल तांदूळ काळया बाजारात जाताना पकडलेला गुन्हा हायकोर्ट मध्ये रद्द. ॲड. श्रीकांत कवडे

प्रतिनिधी- अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या गुप्त माहिती द्वारे बीड येथून निघालेला आणि कॅन्टोन्मेंट येथे पकडण्यात आलेला सोळा चाकी ट्रक मध्ये मिळून आलेल्या तीनशे क्विंटल तांदूळ जप्त करून महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाश तोतला व त्यांच्या मुलावरील गुन्हा व दोषारोप पत्र माननीय हायकोर्ट औरंगाबाद मध्ये रद्द करण्यात आले . प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना क्राईम ब्रँच यांच्याकडून अशी गुप्त माहिती मिळाली की बीड येथून एक सोळा चाकी ट्रक हा राशन दुकानातील तांदूळ घेऊन काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे जात आहे या माहितीवरून अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी सापळा रुचून सदरील ट्रक हा कॅन्टोन्मेंट येथे पकडला व तपासणी केली असता सदरील ट्रक मध्ये सहाशे गोण्या तांदूळ असे एकूण 300 क्विंटल मिळून आला सदरील तांदळाची माहिती ड्रायव्हरला विचारले असता त्याने सांगितले की सदरील तांदूळ हा महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाशजी तोतला यांनी राशन दुकानातील तांदूळ घेऊन प्रोसेस करून सदर तांदूळ हा काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे नवाकार उद्योग येथे पाठवलेला आहे त्याचबरोबर सदरील तांदळाचे पावतीची मागणी केली असता ती ड्रायव्हर कडे मिळून न आल्यामुळे अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी प्रकाश तोतला व त्यांचा मुलगा व ड्रायव्हर व इतर एक जनावर जीवनावश्यक वस्तू कायद्याचे अधिनियम तीन व सात नुसार गुन्हा दाखल केला होता .



सदरील गुन्हा रद्द करण्यासाठी प्रकाश तोतला व त्यांचे मुलगा यांनी एडवोकेट श्रीकांत जी कवडे यांच्यामार्फत माननीय हायकोर्ट औरंगाबाद येथे फौजदारी अर्ज दाखल केला होता सदरील फौजदारी अर्जावर सुनावणी होताना श्री तोतला यांचे वकील कवडे यांनी असे नमूद केले की पोलिसांनी चुकीच्या माहितीच्या आधारे गुन्हा दाखल केलेला आहे सदरील तांदूळ हा काळया बाजारात जात आहे तसेच सदरील तांदूळ हा राशन दुकानाचा आहे याचा कुठलाही पुरावा पोलीस गुन्ह्यामध्ये तसेच दोषारोप पत्रामध्ये सिद्ध करू शकलेले नाहीत व चौकशी अंती त्यांच्याकडे कुठलाही पुरावा दिसून येत नाही हा युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय हायकोर्टाने श्री प्रकाश तोतला व पवन तोतला बीड यांच्यावरील अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन येथे दाखल असलेला गुन्हा तसेच दोषारोपपत्र आरोपीचे वकील ॲड .श्रीकांत. जी .कवडे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने रद्द केले सदर प्रकरणाकडे सर्व मराठवाड्याचे लक्ष लागलेले होते त्यामुळे ॲड. श्रीकांत कवडे यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे..

## संपादकीय

# माफी मागण्याचा मोठेपणा

आमचा शीख फुटिरतावाद, त्यातून निर्माण झालेली स्वतंत्र खलिस्तानची चळवळ हा भारतीय राजकारणातील एक काळाकुट्ट अध्याय. क्षणिक आणि तात्पुरत्या राजकीय फायद्यासाठी धार्मिक कट्टरपंथीयांस जवळ केले की काय होते याचा तो मूर्तिमंत आणि अत्यंत हिंसक धडा. त्याची परिणती माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येत झाली. त्याआधी या शीख दहशतवाद्यांच्या भस्मासुराचा बीमोड करण्यासाठी श्रीमती गांधी यांच्यावर अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात लष्कर पाठवण्याची वेळ आली. शीख फुटिरतावाद्यांचा नेता जर्नेलसिंग भिंद्रनवाले हा सुवर्ण मंदिरात दडून बसलेला होता. त्यास नेस्तनाबूत केल्याखेरीज या खलिस्तानी चळवळीचा अंत होणे अवघड हे लक्षात आल्यानंतर इंदिरा गांधी यांनी लष्करप्रमुख अरुणकुमार वैद्या यांस सुवर्ण मंदिरात लष्करी कारवाईचा आदेश दिला. त्याबरहुकूम वैद्या यांनी ही लष्करी कारवाई केली आणि भिंद्रनवाले त्यात मारला गेला. या कारवाईचा सूड म्हणून दोघांची हत्या झाली. एक खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधी. आणि दुसरे जनरल वैद्या. निवृत्तीनंतर अवघ्या सहा महिन्यांत, १९८६ साली, पुणे येथे शीख मारेकऱ्यांनी जनरल वैद्या यांस भर रस्त्यात गोळ्या घालून ठार केले. त्यामुळे इंदिरा गांधी यांच्या हत्येच्या आठवणी ताज्या झाल्या. श्रीमती गांधी यांची हत्या त्यांच्याच शीख सुरक्षा रक्षकांनी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर देशभर शिखांविरोधात संतापाचा आगडोंब उसळला. ठिकठिकाणी त्यांचे शिरकाण झाले. राजधानी दिल्लीत तर कहर झाला. रक्ताचे पाट वाहिले. जगदीश टायटलर, सज्जनकुमार आदी काँग्रेस नेत्यांनीच कार्यकर्त्यांस चिथावणी देत शिखांविरोधात हिंसाचारास प्रवृत्त केले. “मोठा वृक्ष कोसळला की त्याखाली लहानसहान झुडपे चिरडली जातात”, अशी त्यावर राजीव गांधी यांची प्रतिक्रिया. म्हणजे त्यांनी एका अर्थी शिखांच्या शिरकाणाचे समर्थनच केले. पुढे यातील काहींविरोधात न्यायालयात गुन्हे दाखल होऊन शिक्षा झाली. तथापि त्या नृशंस शीख हत्याकांडाच्या जखमा अद्यापही भरून आलेल्या नाहीत. या इतिहासाचा संबंध राहुल गांधी यांना ताज्या अमेरिका भेटीत एका शीख तरुणाने काँग्रेसच्या शीखविरोधी कृत्यांविषयी जबाबदार धरले; त्याच्याशी आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली त्या वेळी राहुल गांधी १४ वर्षांचे होते आणि त्या वेळी काँग्रेसच्या राजकारणात त्यांचा काही वाटा असण्याची शक्यता नाही. पण सद्या:स्थितीत ते काँग्रेसचे अघोषित अध्यक्ष आहेत. त्यामुळे “तेव्हा”च्या घटनांविषयी त्यांचा काहीही संबंध नव्हता हे खरे असले तरी सध्याच्या काँग्रेसशी मात्र त्यांचे थेट नाते आहे. त्यामुळे त्या पक्षाच्या इतिहासकालीन पापांसाठी त्यांना वर्तमानात काही विचारले जात असेल तर त्यात काही गैर आहे असे नाही. तेव्हा अमेरिकी तरुणाच्या कृतीबाबत काही आक्षेप घेता येणार नाही. शिखांविरोधात काँग्रेसचे धोरण, त्यातील काही वादग्रस्त नेत्यांस काँग्रेसकडून दिले गेलेले अभय इत्यादी मुद्द्यांची पार्श्वभूमी या तरुणाच्या प्रश्नास होती. त्यास सामोरे जाताना राहुल गांधी यांनी पक्षाने इतिहासात जे काही केले त्याबाबत सपशेल माफी मागितली. “जे घडले तेव्हा मी राजकारणात नव्हतो; पण तरीही जे काही झाले ते चूक होते असेच माझे मत आहे आणि त्याची जबाबदारी घेत मी माफीही मागण्यास मागेपुढे पाहणार नाही”, अशा अर्थाचे विधान राहुल गांधी यांनी केले. याआधीही “८० च्या दशकात” तत्कालीन काँग्रेस नेतृत्वाने जे काही केले त्यासाठी राहुल गांधी यांनी जनतेची क्षमा मागितलेली आहे. अमेरिकेत या माफीची पुनरुक्ती झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवर इतिहासातील कृत्यांसाठी वर्तमानातील नेत्यांनी जाहीर माफी मागितल्याची अनेक उदाहरणे सापडतील. जपानने दुसऱ्या महायुद्धात युद्धकैद्यांशी क्रूर वर्तन केल्याबद्दल मागितलेली माफी, इटलीने लिबियाची मागितलेली, बेल्जियमने अफ्रिकी काँगोची, पोप फ्रान्सिस यांनी कॅनडातील स्थानिकांची, बिल क्लिंटन यांनी मोनिका लुइन्स्की हिची, टायगर वुड्स याने लैंगिक विकृतीसाठी आपल्या चाहत्यांची इत्यादी शेकडो दाखले अशा जाहीर माफीचे देता येतील. पाश्चात्त्य देश, त्यांचे नेते ऐतिहासिक चुकांसाठी वर्तमानात क्षमा मागण्यात कचरत नाहीत. याचे मूळ धर्मसंस्कारांत असावे. ख्रिश्चन धर्मीयांचा धर्मग्रंथ बायबल हा माणूस स्खलनशील असल्याचे स्वीकारतो आणि पश्चात्तापाच्या प्रायश्चित्ताने तो पापमुक्त होऊ शकतो असेही मानतो. अर्थात बौद्ध आणि जैन या भारतात उगम पावलेल्या धर्मांतही क्षमेचे महत्त्व आहेच. तेव्हा राहुल गांधी यांस शीख बांधवांची जाहीर माफी मागावी लागली या सर्वार्थाने शिळ्या कढीस राजकीय आनंदासाठी पुन:पुन्हा उकळी आणण्याचे कारण नाही. राहुल गांधी यांच्यावरील टीका रास्त ठरेल असे अनेक राजकीय प्रमाद आढळतील. असे असताना त्यांनी अमेरिकेत माफी मागितली याबद्दल भाजपच्या काही नेत्यांस आनंदाच्या उकळ्या फुटताना दिसतात. राहुल गांधी यांच्यावर देशातच नव्हे तर परदेशांतही अशी नामुष्की वारंवार येऊ लागली आहे, अशा अर्थाची प्रतिक्रिया भाजपचे नेते यावर देतात. यातून उलट आपल्याच बालबुद्धीचे प्रदर्शन होते याची या मंडळींस जाणीव दिसत नाही. माफी मागण्यात मोठेपणा असतो यावर या मंडळींचा विश्वास नसावा. अमेरिकेसारख्या देशात स्थानिक रेड इंडियन्सवर दीर्घकाळ अत्याचार होत होते. त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले. वास्तविक त्या अत्याचारांत माजी अमेरिकी अध्यक्ष जो बायडेन यांचा काहीही हात नव्हता. तरीही सरकारच्या या औदासीन्याची जबाबदारी त्यांनी घेतली आणि स्थानिकांची माफी मागितली. क्षमा मागावी अशा कृत्यात सहभाग नसतानाही व्यापक औदार्याचे प्रदर्शन करत माफी मागितली गेल्याची आणखीही अनेक उदाहरणे सापडतील. तथापि माफी मागावी अशा कृत्यांस जबाबदार असलेले जनतेची माफी मागण्याइतका मनाचा उमदेपणा दाखवतात का, हा खरा प्रश्न. म्हणजे जमीन हस्तांतरण कायदे जाहीर करून मागे घ्यावे लागले याबद्दल, कृषी सुधारणा विधेयके मागे घ्यावी लागली याबद्दल, निश्चलनीकरणाच्या महान निर्णयामुळे जनतेचे कमालीचे हाल झाले याबद्दल, कट्टर शत्रू असलेल्या पाकिस्तानी पंतप्रधानांच्या कौटुंबिक कार्यक्रमात अकारण हजेरी लावली याबद्दल, पठाणकोट येथे प्रत्यक्ष लष्करी तळाच्या स्वयंपाकघरात अतिरेकी घुसेपर्यंत आपल्या सुरक्षा यंत्रणांस वा गुप्तहेरांस ते कळले नाही याबद्दल, चीनने गलवान खोऱ्यात घुसखोरी केल्याबद्दल, करोनाकाळात टाळ्या-थाळ्या वाजवून घेतल्या याबद्दल किंवा अगदी ताजे उदाहरण म्हणजे पहलगाम येथे सुरक्षा व्यवस्थेत

# अत्त दीपो भव-हे मानवा, स्व मुक्तीसाठी जागृत हो



डॉ.के.पी.वासनिक
मु.पो.नवी दिल्ली
Kpwasnik2002gmail.com,
मो.९८९१९०१३१६.

संपूर्ण मानवजात बुद्धाच्या उपस्थितीने धन्य झाली आहे. बुद्ध म्हणजे “जागृत”, जो अज्ञानाच्या निद्रेतून जागा झाला आहे आणि वस्तुस्थिती जशी आहे तशीच पाहतो. बुद्ध हे एक अद्वितीय मानव होते, ज्यांनी स्वतः च्या प्रयत्नातून औदार्य, त्याग, शहाणपण, ऊर्जा, दृढनिश्चय, शिस्त, सहनशीलता, सत्यता, सद्भावना आणि समता या दहा सर्वोच्च गुणांचा सराव केला. आपल्या मानसिक शुद्धीकरणाद्वारे त्यांनी सर्व ज्ञानाचे दरवाजे उघडले. बुद्ध केवळ बौद्धिक कुतूहल भागवण्यासाठी ते काही बोलले नाहीत. ते एक व्यावहारिक शिक्षक होते आणि त्यांनी फक्त अशाच गोष्टी शिकवल्या ज्यामुळे मनुष्याला शांती आणि आनंद मिळेल. त्यांनी बोधी वृक्षाखाली (पीपळ वृक्ष - फिकस रिलिजिओसा) खोल एकाग्रतेने ध्यानाचा सराव केला आणि आत्मज्ञान प्राप्त केले. त्यांच्या आयुष्यात त्यांनी तीव्र आनंद आणि अत्यंत वंचिततेचा अनुभव घेतला होता, परंतु त्यांना आढळले की कोणत्याही प्रकारची टोकाची भूमिका शांती आणि आनंदासाठी चांगली नाही. म्हणून, त्यांनी आपल्याला जीवनात मध्यम मार्गाचा अवलंब करण्याचा सल्ला दिला. बुद्ध नेहमी स्वतःला एक मानवी शिक्षक मानत होते, ज्याचा संदेश मानवाच्या आनंद आणि कल्याणासाठी होता. लोक ज्ञान मिळवण्यासाठी शाळेत जातात आणि लोक ज्ञानी होण्यासाठी बुद्धाकडे जातात. बुद्धांनी केवळ अंधश्रद्धा आणि सर्वशक्तिमान शक्तीच्या भीतीला परावृत्त केले आणि अनुपयुक्त संस्कार आणि कर्मकांडांचे पालन करण्याचा निषेध केला. उपवास, नद्यांमध्ये स्नान, पशुबळी आणि तत्सम कृत्ये यांसारख्या बाह्य गोष्टींचा अवलंब केल्याने मनुष्य शुद्ध किंवा श्रेष्ठ बनत नाही. लोकांना अंधश्रद्धेपासून दूर ठेवण्यासाठी बुद्धांनी खूप कष्ट घेतले. बुद्धाचा एकमात्र हेतू इतरांना हे स्पष्ट करायचा होता की गोष्टी जशा आहेत तशाच पाहाव्यात आणि काही मानवी, अतिमानवी किंवा अगदी इन्फ्रा-मानवी या बाह्य शक्तीच्या प्रभावाखाली येऊ नये. प्रार्थना, यज्ञ, कर्मकांड आणि धार्मिक विधी यांमुळे कोणाच्याही इच्छा पूर्ण होत नाहीत. त्यांनी व्यक्तीच्या नैतिक जीवनावर अधिक भर दिला. बुद्ध म्हणतात की देवावर किंवा इतर कोणत्याही काल्पनिक शक्तीवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती माणसाचा स्वतः च्या सामर्थ्यावरचा विश्वास कमकुवत करते. म्हणून बुद्ध आपल्याला आपल्या स्वतः च्या प्रयत्नांवर विश्वास ठेवण्यास भाग पाडतात. ज्यांना धम्माचे सामर्थ्य आणि धम्मानुसार कसे जगायचे हे समजू शकत नाही, ते नेहमीच सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा, कट्टरता यांना शरण जातात आणि स्वतःला अनेक प्रकारच्या देव, आत्मे आणि गूढ शक्तींच्या प्रभावाखाली आणून विचित्र संस्कार आणि विधी करतात. अनेकांच्या मते मनुष्य हा दैवी शक्तीचा गुलाम आहे, पण बुद्धाला ते मान्य नाही. तथागत बुद्ध देवत्व किंवा विश्वातील इतर कोणत्याही अलौकिक शक्तींना मानवाच्या बुद्धीपेक्षा श्रेष्ठ मानत नाहीत. बुद्ध हा देवाचा अवतार, देवाचे दूत असल्याचा दावा करत नाही. बुद्धांनी मोक्ष देण्याचे वचन दिले नाही. बुद्धांनी कधीही स्वतःला तारणहार म्हणून घोषित केले नाही. बुद्ध म्हणाले, मी मार्गदाता आहे, मुक्तिदाता किंवा मोक्षदाता नाही. बुद्ध लोकांना दुः खातून मुक्तीसाठी स्वतः वर, स्वतःच्या शक्तीवर अवलंबून राहण्यास सांगतात. बुद्धांनी मानवाला प्रेरणा दिली की, मनुष्य स्वतः चा उद्धारकर्ता आहे- अत्त दीपो भव. प्रत्येक व्यक्तीने स्वतः च्या प्रयत्नातून निब्बाणावस्था प्राप्त केली पाहिजे. बुद्ध म्हणाले, प्रत्येक माणसामध्ये बुद्ध बनण्याची क्षमता असते. बुद्धत्व केवळ निवडक लोकांसाठी किंवा अलौकिक प्राण्यांसाठी राखीव नाही तर कोणीही बुद्ध होऊ शकतो. स्वतः च्या प्रयत्नातून माणूस सर्वोच्च ज्ञानापर्यंत पोहोचू शकतो हे दाखवून दिले. बौद्ध धम्म कोणालाही दैवी प्राणी बनण्यास शिकवत नाही, परंतु तो देवांना देखील मानव बनण्यास प्रोत्साहित करतो. असा एकही प्रसंग आला नाही की बुद्ध रागाने भडकले, कधीच असा प्रसंग आला नाही की एखादा निर्दयी शब्द त्यांच्या ओठातून निघाला. बुद्ध नेहमी आपल्या विरोधकांशी आणि सर्वात वाईट शत्रूंशीही मैत्री आणि करुणेने वागलेत. बुद्धांनी आयुष्यभर अफाट सहिष्णुता प्रदर्शित केली. त्यांनी विरोधकांना शांतपणे आणि आत्मविश्वासाने जिंकले. बुद्धाच्या विरोधकांनी त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्नही केला, तरीही बुद्धांनी त्यांना कधीही शत्रू मानले नाही. बुद्ध एकदा म्हणाले , जसा रणांगणावरील प्रशिक्षित हत्ती त्याच्यावर मारले जाणारे बाण सहन करतो, त्याचप्रमाणे मी इतरांचे अपमान आणि मित्रत्वहीन अभिव्यक्ती सहन करतो. गौतम बुद्ध हे आध्यात्मिक प्रगल्भता आणि सर्वोच्च नैतिक सामर्थ्य यांचे शक्तिशाली संयोजन होते. एकदा बुद्ध भारतातील कोसल प्रदेशात भ्रमण करीत असताना कलामा लोकांच्या केसापुत्त गावात आले. कलामा लोकांनी तथागत बुद्धाला विचारले की ते खऱ्या शिकवणींना खोट्या शिकवणीपासून कसे ओळखू शकतात. तथागत बुद्धांनी उत्तर दिलेः तथागत बुद्धांनी उत्तर दिलेः तथागत बुद्धांनी उत्तर दिलेः तथागत बुद्धांनी उत्तर दिलेः तथागत बुद्धांनी उत्तर दिलेः एखाद्या गोष्टींची, तत्वाची, विचारांची पुनरावृत्ती होत असल्यामुळे किंवा परंपरेतून, धर्मग्रंथांतून, अफवा, अंदाज, चुकीचे तर्क, आणि विषयाबद्दलचा पक्षपातीपणा, चतुर वक्तृत्व, किंवा शिक्षक किंवा वक्त्याचा केवळ आदर म्हणून स्वीकार करू नका. जेव्हा तुम्हाला स्वतः ला माहित असेल की एखादी गोष्ट हानिकारक असून दुः खाला कारणीभूत ठरते आणि ज्ञानी लोक त्याचे स्वागत करत नाहीत, तेव्हा ते सोडून द्या. बुद्ध पुढे म्हणाले, माझ्या प्रत्येक शब्दावर विश्वासावर ठेवू नका, मी जे बोललो म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. माझ्या शिकवणीचे नीट परीक्षण करा. सोनार ज्या प्रकारे सोन्याला कापून, घासून आणि वितळवून ते खोटे, मिश्रित किंवा शुद्ध सोने आहे की नाही हे पाहण्यासाठी तपासतो, त्याचप्रमाणे तुम्ही विविध पद्धतीने माझ्या शिकवणींचे परीक्षण करून, विश्लेषण आणि तर्क वापरून स्वीकारली पाहिजे. जे परीक्षेत उत्तीर्ण होईल तेच स्वीकारा. शिक्षक शिकवत असलेल्या सत्यावर अवलंबून रहा. त्याच्या व्यक्तिमत्त्वावर नाही. तो बोलतो त्या शब्दांवर नाही. आंशिक तात्पुरत्या समजुतीवर नाही. तुमच्या निर्णयक्षम बुद्धीपेक्षा तुमच्या शहाणपणावर विसंबून राहा. इतिहासात प्रथमच त्यांनी माणसाला स्वतः साठी विचार करण्याची शक्ती दिली. बुद्ध आपल्याला धम्म आचरणात आणताना इतर धर्माच्या अनुयायांना त्रास न देता एकत्र राहायचे, सहकार्याने, प्रेमाने, मित्रत्वाने, करुणेने वागायचे शिकवितात. जर आपल्याला धार्मिक पूर्वग्रह आणि संघर्षांशिवाय शांततेने जगायचे असेल तर इतरांच्या श्रद्धा आणि धर्माचा आदर केला पाहिजे. या पृथ्वीवर सुखी आणि शांतीपूर्ण जीवन निर्माण करायचे असेल तर पक्षपातीपणा आणि पूर्वग्रहांपासून मुक्त असणे आवश्यक आहे. सहिष्णुता आणि शांततेसाठी बुद्धाचे संदेश अद्वितीय आहेत. गौतम बुद्धांची शिकवण आजच्या जगात अधिक आवश्यक आणि प्रासंगिक आहे जिथे विविध मुद्द्यांवर असहिष्णुता आणि गैरसमज आहेत. परस्परावलंबनाची समज नसल्यामुळे आजचे जग युद्धाच्या उंबरठ्यावर आहे. बुद्धाची शिकवण अधिक उदारमतवादी आणि लोकशाहीवादी आहे. बुद्धांनी कधीही दुसऱ्या माणसाच्या विचारस्वातंत्र्यात हस्तक्षेप केला नाही. विचारस्वातंत्र्य हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे. एखाद्याचा दृष्टीकोन, चारित्र्य, अध्यात्मिक प्रवृत्ती यांचा आदर केला पाहिजे. कोणत्याही प्रकारची सत्ती वाईट असते असे त्यांचे मत होते. तरीपण सत्य काय आहे हे सांगणे प्रत्येक विवेकी माणसाचे कर्तव्य आहे. गौतम बुद्धांनी जीवनाचा उद्देश सांगितला. खरे ज्ञान मिळवणे, मैत्रीपूर्ण, उपयुक्त आणि ज्ञानी जीवन जगणे हा जीवनाचा उद्देश असावा. केवळ अशाच प्रकारच्या जीवनाला अर्थपूर्ण आणि यशस्वी जीवन म्हणता येईल. चांगले मानवी गुण जोपासावेत, सत्कर्म आचरणात आणावे आणि कोणत्याही स्वार्थी हेतूशिवाय इतरांना मदत करावी, असा सल्लाही त्यांनी दिला. आज आपल्यात तथागत बुद्धाची भौतिक उपस्थिती नसली तरी त्यांची शिकवण गेल्या २५८८ वर्षांपासून मानव कल्याणासाठी उपयुक्त आणि हितकारक राहिली आहे. बुद्धाचा मार्ग हा प्रत्येक जीवाच्या शांती आणि आनंदासाठी एक धार्मिक जीवनपद्धती आहे. दुः खातून मुक्ती मिळवण्याची ही एक पद्धत आहे. बुद्धाची शिकवण ही एक राष्ट्र, भूभाग किंवा वंशापुरती मर्यादित नाही. तो पंथ नाही की निव्वळ श्रद्धा नाही, तर संपूर्ण विश्वासाठी आणि मानवतेसाठी कल्याणकारी संदेश आहे. निः स्वार्थ सेवा, सदभावना, शांती आणि दुः खापासून मुक्ती ही बुद्धाच्या शिकवणुकीचे उद्दिष्टे आहेत. आजच्या बौद्ध पूर्णिमेला आपण सर्वांनी संकल्प करू या की तथागत बुद्धाची शिकवणूक आपल्या दैनंदिन जीवनात आचरण करू तसेच आपल्या विवेकबुद्धीप्रमाणे इतरांना ती समजावून देण्याचा प्रयत्न करू □--

# भारतावर युद्धाचे सावट, देशभरात आज मॉक ड्रील, महाराष्ट्राची स्थिती काय?

पहलगाम हल्ल्यानंतर सध्या भारत आणि पाकिस्तानात युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर आज 7 मे बुधवार रोजी राज्यात ठिकठिकाणी मॉक ड्रिल होणार आहे. देशभरातील युद्धसदृश परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयारीचा एक भाग म्हणून हे मॉक ड्रिल होणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक यांसह तब्बल १६ शहरांमध्ये हे मॉक ड्रील आयोजित करण्यात आले आहे. गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार आज अनेक राज्यांमध्ये मॉक ड्रिल आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शाळा, मॉल, रेल्वे स्थानके, बस स्टँड आणि इतर गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी मॉक ड्रिल होणार आहे. महाराष्ट्रातील पुणे आणि मुंबईसह एकूण 16



शहरांमध्ये ही मॉक ड्रिल आयोजित केली जाणार आहे. जर भारतात हल्ल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली तर नागरिकांनी आणि प्रशासनाने कशा प्रकारे प्रतिसाद द्यावा, यासाठी गृहमंत्रालयाने सर्व राज्यांना मॉक ड्रिलचे आदेश दिले आहेत. त्यानुसार मुंबई, पुणे, नाशिक यांसारख्या महत्त्वाच्या १६ शहरात मॉक ड्रिल होणार आहे. महाराष्ट्रातील 16 शहरांमध्ये आज मॉक ड्रिल: मुंबई उरण-जेएनपीटी तारापूर पुणे ठाणे नाशिक थळ-वायशेत रोहा-धाटाव-नागोठाणे मनमाड सिन्नर पिंपरी-चिंचवड संभाजीनगर भुसावळ रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग या ठिकाणी युद्धाच्या परिस्थितीत काय करावे, यासाठीच्या कार्यवाहीचे मॉक ड्रिल होणार आहे. या मॉक ड्रिलमुळे आपत्कालीन परिस्थितीत अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज होण्यास मदत होणार आहे. सायरन वाजल्यावर काय करालं? तात्काळ सुरक्षित आश्रयस्थळी जालं. 5 ते 10 मिनिटात सुरक्षित ठिकाणी पोहोचा. सायरन वाजल्यानंतर घाबरुन जाऊ नका. फक्त मोकळ्या जागेपासून लांब रहा. घरात आणि सुरक्षित इमारतींच्या आत प्रवेश करा. टीव्ही, रेडियो, सरकारी अलर्ट्सवर लक्ष द्या. अफवावर विश्वास ठेऊ नका प्रशासनाच्या सूचनांच पालन करा. सायरन कुठे-कुठे लागणार? सरकारी भवन प्रशासनिक भवन पोलीस मुख्यालय फायर स्टेशन सैन्य ठिकाणं शहरातील मोठे बाजार गर्दीच्या जागा सिविल मॉक ड्रिलमध्ये कोण-कोण? जिल्हाधिकारी स्थानीय प्रशासन सिविल डिफेंस वार्डन पोलिसकर्मी होम गार्ड्स कॉलेज-स्कूल विद्यार्थी नॅशनल कॅडेट कॉर्प्स (NCC) नॅशनल सर्विस स्कीम (NSS) नेहरू युवा केंद्र संगठन (NYKS)

# बिथरलेल्या पाकिस्तानकडून LoC वर फायरिंग, ३ भारतीयांचा मृत्यू, भारतीय सैन्याचं चोख प्रत्युत्तर

पहगाम येथे झालेल्या हल्ल्याला भारताने चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारताने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिलं असून ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील 9 दहशतवादी अड्डे उद्धस्त केले आहेत. भारताच्या अॅक्शननंतर पाकिस्तानला मोठी धडकी भरली आहे. पाकिस्तानने देखील LOC वर फायरिंग केली. ज्यामध्ये 3 लोकांचा मृत्यू धाला आहे. पाकिस्तानी मोर्टार शेलिंगमध्ये एका महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती पुंछ जिल्हा अधिकाऱ्यांनी केली आहे. भारतीय लष्करानेही याला चोख प्रत्युत्तर दिलं आहे. ज्यामध्ये पाकिस्तानी सैन्याचेही मोठं नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सद्याची परिस्थिती पाहाता जम्मू, सांबा, कठुआ, राजौरी आणि पूंछ येथील सर्व शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था आज बंद राहतील. पाकिस्तान आपल्या नापाक कारवाया थांबवण्याची कोणतीही चिन्हे दाखवत नाहीयेत. भारताने पाकिस्तानला धडा शिकवण्याचा प्रयत्न करत आहे, तर घाबरलेल्या पाकिस्तानने नियंत्रण रेषेवर पुन्हा गोळीबार केला. जम्मू आणि काश्मीरच्या समोरील नियंत्रण रेषेवरील आणि आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानी सैन्याने अंदाधुंद गोळीबार केला, ज्यामध्ये तोफखान्याचा माराही समावेश होता. या अंदाधुंद गोळीबारात तीन निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. पाकिस्तानच्या





या गोळीबाराला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिले. याआधीही पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तान सातत्याने युद्धबंदीचे उल्लंघन करत आहे, ज्याला भारत चोख प्रत्युत्तर देत आहे. पाकिस्तानने पुन्हा एकदा शस्त्रसंधीचे उल्लंघन करत पूंछ-राजौरी सेक्टरमधील भिंबर स्ट्रीट आणि कुपवाडा जिल्ह्यातील कर्नह भागात गोळीबार केला. पाकिस्तानकडून होत असलेल्या सततच्या हल्ल्यामुळे लोक घाबरले आहेत आणि स्वतःचे रक्षण करण्यासाठी ते भूमिगत बंकरमध्ये लपले आहेत. सांगायचं झालं तर, पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कडक कारवाई केली आहे

# लाडशाखीय वाणी समाज कल्याण,कलामंचचे यशस्वी ९ वे वर्ष

रविवार दिनांक 4 मे रोजी लाडशाखीय वाणी समाज मंडळ अंतर्गत कलामंच आयोजित वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धेत यशस्वी झालेल्या उत्साही विद्यार्थ्यांचा गौरव कार्यक्रम कल्याण येथे नियोजन बद्ध व जल्लोषात संपन्न झाला,एकूण 45 ते 50 बालकलाकारांचा सहभाग असलेला गायन, नृत्य,नाटिका, व देशभक्ती पर गीत असे एकापेक्षा एक सुरेख सदाबहार कार्यक्रम 340 ते 350 प्रेक्षकांच्या एवढ्या जास्त संख्येने उपस्थितात झाला. कार्यक्रमात व्यासपीठावर : कल्याण कलामंच प्रमुख श्री. पी. बी. वाणी सर, अध्यक्षा: सौ. सारिका पूरकर मॅडम,खजिनदार: श्री. अनिल मराठे सर, सल्लागार: श्री.एम.डी.वाणी सर, सौ. नेहा नेर



मॅडम कल्याण मंडळाचे उपाध्यक्ष: श्री. राजेंद्र पाखले साहेब, श्री. उमाकांत कुडे सर, प्रगती



महिला मंडळाच्या अध्यक्षा: सौ. स्नेहा मराठे मॅडम, संस्कार वाणी युवा मंडळाचे अध्यक्ष: सुबोध मालपुरे उपस्थित होते. अतिशय उत्कृष्ट निवेदन: कलामंच सचिव: सौ. वैशाली मोराणकर मॅडम यांनी केले. कलामंच अध्यक्षा सौ.सारिका पुरकर मॅडम यांनी प्रास्ताविकात वर्षभरात “ एकच ध्यास समाजातील विद्यार्थ्यांचा सुप्त कलागुणांचा विकास “ याच उद्देशाने झालेल्या विविध कार्यक्रमांचा आढावा घेतला. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी 2 थीम देण्यात आल्या होत्या.1.बॉलिवूड Retro theme व 2.अतूल्य माझा भारत सांस्कृतिक कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे ह्या कार्यक्रमाचे निवेदन हे मुलांनीच bollywood actor च्या भूमिकेतून सादर केले.

# सुप्रसिध्द भावगीतातला शुक्रतारा



*** कै.मा.श्री. अरूण दाते सरांना भावपुर्ण आदरांजली *** स्वरगंगेच्या काठावरती,निखळला तो शुक्रतारा. रडती दंमयती, रडती शकुंतला,रडती सारी भावस्वरा, गतजन्माचा वारसा तो,नेला पुढती सप्तस्वरा सप्तस्वरा, नाव नाही स्वरा मध्ये,दुसरे कोण भावणारे स्वरा स्वरा, अफाट जगती तूच शुक्रतारा,जीवनाचे भावगीत स्वरा, आता कोणत्या स्वरावर शतःदा प्रेम करावे, तुझी सर त्या स्वराला न यावे, चंचल मना कोण समजावे, या अश्रूधारा ना इथे थांबवावे, सप्तरंगाचा उघडूनी पदर,भावगीते प्रसिध्द कुणी केली, काळोखच पडला सर्व ऋतूंना,कोण त्यांना समजावे, गाणी आपुली आम्हाला, या जन्मावर शतःदा प्रेम करण्या लावे, विश्वास ना उरे मरणावर, विश्वास ना उरे या जगण्यावर, निखळतो जेव्हा हा शुक्रतारा निखळतो जेव्हा हा शुक्रतारा. *** कवयित्री दिपाराणी गोसावी ***

# वाळूची वाहतूक करणारा ट्रॅक्टर गेवराई पोलिसांनी पकडला

गेवराई। प्रतिनिधी शहरातील कॅंब्रीज शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावरून ट्रॅक्टरच्या साहाय्याने अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती गेवराई पोलिसांना मिळताच (दि.५) सोमवार रोजी कारवाई करत ६,०६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गेवराई शहरातील कॅंब्रीज शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावरून अवैध वाळूची वाहतूक करताना सौरभ भाऊसाहेब मारवले (वय २५) रा.मिरगाव ता.गेवराई जि. बीड याच्यावर गेवराई पोलिसांनी (दि.५) सोमवार रोजी कारवाई केली. यात एक लाल रंगाचे स्वराज ७४४ एक्स टी एन कंपनीचे विना नंबरचे ट्रॅक्टर व पिवळ्या रंगाची ट्रॉली अंदाजे किंमत ६,००,०००,व ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास वाळू किंमत ६,००० रुपये असा एकूण ६,०६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत.

# पाकिस्तानचं आता काही खरं नाही, बलाढ्य रशियाचे राष्ट्रपती पुतीन भारतात येणार, हायलेव्हल मिटिंग

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धाची स्थिती निर्माण झाली आहे. भारताने आपले सैन्य सज्ज ठेवले आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानातून भारताला पोकळ धमक्या दिल्या जात आहेत. दरम्यान, असे असतानाच आता जगातील बलाढ्य देशांपैकी एक असणाऱ्या रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन थेट भारतात येणार आहेत. एकीकडे भारत-पाकिस्तान यांच्यात तणावाची स्थिती असताना पुतीन यांनी भारतात येण्याच्या आमंत्रणाचा स्वीकार करण्याच्या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

रशियाने भारताचं निमंत्रण स्वीकारलं मिळालेल्या माहितीनुसार व्लादिमीर पुतीन हे लवकरच भारतात येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुतीन यांना भारतात येण्यासाठी आमंत्रित केले होते. याच आमंत्रणाचा रशियाने स्वीकार केला असून याबाबतची माहिती रशियाचे राष्ट्राध्यक्ष कार्यालय क्रेमलीनने दिली आहे. रशिया आणि भारत यांच्यात लवकरच




द्विपक्षीय शिखर संमेलन होणार आहे. त्यासाठीच मोदी यांनी पुतीन यांना भारतात येण्यासाठी आमंत्रित केलं होतं. रशियाने हे आमंत्रण स्वीकारलं आहे. पहलगामविषयी रशियाची भूमिका काय? पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा रशियाने तीव्र निषेध केला आहे. तसेच दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी रशिया कायम भारतासोबत असेही रशियाने स्पष्ट केले आहे. दहशतवादाविरोधात लढाई करताना कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असंही रशियाने सांगितलंय. यासह भारत आणि रशिया यांच्यातील संबंधांवर कोणत्याही बाहेरच्या शक्तीच्या प्रभाव पडणार नाही, असा विश्वासही रशियाने व्यक्त केला आहे.पुतीन नेमकं काय म्हणाले होते?पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पुतीन यांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला होता. तसेच मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या होत्या. विशेष म्हणजे अशा स्थितीत दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी रशिया भारतासोबत आहे, असेही पुतीन यांनी स्पष्ट केले होते. या हल्ल्यातील दोषींना तसेच त्यांच्या समर्थकांना न्याच्या कक्षेत आणलं पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली होती. 7 मे रोजी होणार मॉक ड्रिल दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धाचे ढग आणखी गडद झाले आहेत.

# प्रेरणा फाउंडेशन महाराष्ट्र सामाजिक संस्थेचा ७ वा वर्धापन दिन सत्कर्म आश्रमात मुलांसाठी मोफत आरोग्य शिबीर व सामाजिक पुरस्कार वितरण सोहळा धुमधडाक्यात साजरा.

बदलापूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) प्रेरणा फाउंडेशन रजि. 564/एफ38784/बदलापूर/ठाणे/महाराष्ट्र या सामाजिक संस्थेचा 4 मे 2025 रविवार रोजी प्रेरणा फाउंडेशन 7 वा वर्धापन दिन सोहळा सकाळी 10 ते दुपारी 3 वाजता सत्कर्म बालकाश्रम, बदलापूर येथे मोफत आरोग्य शिबीर व पुरस्कार वितरण करून 7 वा वर्धापन दिन धुमधडाक्यात साजरा झाला. मोफत आरोग्य तपासणी तसेच पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन प्रेरणा फाउंडेशन च्या संस्थापिका/अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले ,यांना बहुमोलाचे सहकार्य सन्माननीय व मा. रामजीत गुप्ता सर, फिजिओथेरपीस्ट डॉ. पारुल लाड महेंद्रू (मोलाचा) वाटा व मा. डॉ.राहत शेख यांनी केले.या कार्यक्रमाला फाउंडेशन चे सचिव वैभव कुलकर्णी, खजिनदार कु. रोहन गावकर, मा.अविनाश म्हात्रे श्री.मंगेश सावंत यांचे विशेष सहकार्य लाभले. व तसेच या सोहळयाला सामाजिक, काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. प्रेरणा फाउंडेशन हे एक सामाजिक संस्था असून प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. प्रेरणा फाऊंडेशन गेले सहा वर्ष सतत गोर गरीब लोकांना, रस्त्यावरील भटकी लोकांना, अनाथांना आधार देण्याचे काम करते. अनेक आदिवासी पाडे सुधारणे, आदिवासी गावाला रस्ता, वीज, पाणी व लाईट याची सोय, नदया,चौपाटी,एस टी डेपो, रेल्वे स्टेशन,रस्ते,ठिकठिकाणी स्वछता अभियान राबविणे, अनेक अनाथालय, वृद्धाश्रम, अनाथ रस्त्यावरील भटकी मुले यांना सहारा व सहकार्य देण्याचे काम करते. व तसेच प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ व प्रेरणा इन्स्टिटयूट अंतर्गत येणारे उपन्न सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी ह्या कॅन्सरग्रस्त,किडनीग्रस्त ई. मतिमंद निराधार लोकांना आधार देण्यासाठी वापरतात.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मुख्य तपासी अधिकारी मा .श्री.रामजीत (जीतू) गुप्ता, बृह मुंबई होमगार्ड विभाग मा. श्री. केंद्राचे माजी गायक, जितेंद्रि अभिषेकी यांचे शिष्य,प्रसिद्ध गायक), मा. श्री. रघुनाथ फडके, मा.सौ.श्रुती आठल्ये,



दिलीप नारकर, वैद्यकीय तपासणी सहायक अधिकारी धनंजय पवार.अध्यक्ष दीनदयाल कुष्ठरोग संस्था, अध्यक्ष मा. श्री. अविनाश म्हात्रे ,(मुंबई आकाशवाणी समाजसेवक,पत्रकार मा.श्री.राम घरत, फिजिओ थेरपिस्ट मा.डॉ.पारुल लाड महेंद्रू, मा सौं राजकुमारी गुप्ता मा.डॉ. राहत शेख, मा.पी.एस. कदम उपस्थित होते प्रेरणा फाउंडेशन संस्थापिका सौ.प्रेरणा कुलकर्णी व सर्व अतिथीच्या हस्ते पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला जनजागृती सेवासमिती अध्यक्ष मा श्री.गुरुनाथ तिरपणकर व सत्कर्म आश्रम चे अध्यक्ष नामदेव पेशने व सचिव मकरंद वढवेकर व आश्रम कमिटी यांची उपस्थिती होती सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी व श्री.वैभव कुलकर्णी यांनी सूत्र संचालन निभावले. मा. राजकुमारी गुप्ता मॅडम ,शैलेश सणस सर, मा. हर्षल सर, उर्मिला ताई.,मा सहदेव पाटकर, युवा समाजसेवक मा राम घरत सर,अण्विक्षा कोडापे मॅडम, वंदना ठाकूर मॅडम, मा. संध्या कासारे समाजसेविका, मा ज्योती वाघ ताई समाजसेविका, मा. मिलिंद व मिताली आंबेरकर, मा. रोहित महाले, मा. राजेश भांगे, मा रंजना परब, तसेच मा. संतोषी बांगर , राजश्री सोनावणे यांनी मुलांना वस्तू खाऊ स्वरूपात भेट देऊन मुलांना सहकार्य केले तर अनेक समाजसेवकांनी 500 रुपये प्रमाणे ऐकून 6 लोकांनी रक्कम स्वरूपात आश्रममधील मुलांना प्रेरणा फाउंडेशन महाराष्ट्र अंतर्गत संस्थापिका सौ.प्रेरणा कुलकर्णी यांनी आपल्या नाट्यमंडळातून तुन 10000 रुपयाचा चेक सत्कर्म बालका श्रमास देऊन मदत केली..तसेच त्यांनी सादर केलेल्या कलेला विविध बक्षिसे दिली..या कार्यक्रमात मा प्रसिद्ध लेखिका सौं.बाविस्कर मॅडम यांचा पुस्तकं प्रकाशन सोहळा ही पार पडला. या कार्यक्रमाला कु रोहन गावकर मा.श्री. मंगेश सावंत, सदस्य सौ. गंधाली तिरपणकर , मा.ज्योती वाघ यांचे सहकार्य लाभले. प्रेरणा फाउंडेशन संस्थापिका. सौ प्रेरणा कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले. मा.श्री. रामजीत गुप्ता सरांनी अन्नदानाचा आश्रमातील मुलांसोबत सर्वांनी सुंदर स्वादिस्ट भोजनाचा जवळजवळ 200 हुन अधिक लोकांनी जेवणाचा आस्वाद घेतला व कार्यक्रमाची सांगता झाली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com